दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

**सुविचार**
तुमच्या जीवनात कसले हि उतार चढाव आले तरी तुमचे विचार हेच तुमचे प्रमुख भांडवल असायला हवे.

SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 42 ■ रविवार, 3 मे 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

## पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज; नाम फाउंडेशनच्या मदतीने जलतारा अभियानाला वेग

# धाराशिव जिल्ह्यात जलतारा प्रकल्पाची युद्धपातळीवर मोहीम

## ५०० गावांत १ लाख खड्ड्यांचे उद्दिष्ट

आरंभ मराठी । धाराशिव

**धाराशिव जिल्ह्यात जलतारा प्रकल्प राबविण्यासाठी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी विशेष मोहीम हाती घेतली असून यामध्ये अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या नाम फाउंडेशनची महत्त्वपूर्ण मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यातील ५०० गावात यावर्षी एक लाख जलतारा प्रकल्प करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, तुळजापूर आणि भूम तालुक्यात ही कामे सुरू करण्यात आली आहेत. या मोहिमेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विशेष कौतुक केले आहे.**

मागील वर्षी सुरू करण्यात आलेले जलतारा प्रकल्प अवकाळी पावसामुळे पूर्ण होऊ शकले नव्हते. जिल्हाधिकारी पुजार यांनी मागील वर्षी एप्रिल महिन्यात धाराशिव जिल्ह्यात जलतारा प्रकल्प मोठ्या प्रमाणात राबवण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली होती. मात्र मे महिन्यातच मान्सून दाखल झाल्यामुळे तसेच मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यामुळे अनेक ठिकाणी ही कामे अपूर्ण राहिली. यावर्षी संभाव्य अल निनो परिस्थिती, तसेच सरासरीपेक्षा कमी पावसाचा हवामान विभागाचा अंदाज यामुळे पुढील काळात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी पुजार यांनी अलीकडील काही दिवसांत विशेष बैठका घेऊन जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये जलतारा प्रकल्प युद्धपातळीवर राबविण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे यावेळी नाम फाउंडेशनकडून मोफत जेसीबी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविण्यात आली आहे. मागील वर्षी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा)च्या माध्यमातून जलतारा प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे कामात अडथळे निर्माण झाले. त्यामुळे यावर्षी कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी प्रशासनाने सामाजिक संस्थांचे सहकार्य घेण्याचा निर्णय घेतला आहे. याला नाम फाउंडेशन, शरण पाटील फाउंडेशन तसेच जिल्ह्यातील व राज्यातील इतर सामाजिक संस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. पहिल्याच दिवशी तुळजापूर तालुक्यातील तीर्थ (बु.) या गावात ३० जलतारा खड्डे घेण्यात आले.



### महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागांचा सहभाग

धाराशिव जिल्ह्यात जवळपास ७०० गावे असून त्यापैकी ५०० गावांमध्ये जलतारा प्रकल्प राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभाग एकत्रितपणे काम करणार आहेत. प्रत्येक तालुक्यातील ३३ टक्के गावे तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांना वाटप करण्यात आली आहेत. तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्या माध्यमातून ही कामे प्रत्यक्ष राबवली जाणार असून संबंधित अधिकाऱ्यांनी गावांचे पालकत्व स्वीकारून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे ठरवले आहे.

### सामाजिक संस्थांचा मोठा सहभाग

जलतारा प्रकल्पासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सामाजिक संस्थांना सहकार्याचे आवाहन केले होते. त्याला नाम फाउंडेशनने तत्काळ प्रतिसाद देत जेसीबी यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याची जबाबदारी घेतली आहे. तर शरण पाटील फाउंडेशन व इतर संस्था डिझेल पुरविणार आहेत. प्रशासन व स्वयंसेवी संस्थांच्या या संयुक्त प्रयत्नामुळे मोहीम अधिक वेगाने राबवली जाण्याची अपेक्षा आहे.



### एका गावात किमान ५० जलतारा करण्याचे उद्दिष्ट

जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये ही मोहीम राबवली जाणार असून ज्या शेतकऱ्यांनी मागणी केली आहे त्यांच्यापर्यंत पोहोचण्यावर भर देण्यात येणार आहे. 'एकरी एक जलतारा' या तत्त्वावर काम करत प्रत्येक गावात किमान ५० जलतारा खड्डे घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. काही गावांमध्ये यापेक्षा अधिक संख्येने खड्डे घेण्याचीही मुभा देण्यात आली आहे.

### असा असेल प्रकल्प

**लांबी : १.५ मीटर**
**रुंदी : १.५ मीटर**
**खोली : १.८० मीटर**
**एकरी : १ खड्डा**
**उद्दिष्ट : ५०० गावांमध्ये १ लाख जलतारा**

### जलताराचे फायदे

भूजल पातळीत लक्षणीय वाढ होईल
पाणी साचणाऱ्या (चिबड) जमिनीवरील पिकांचे नुकसान टळेल
पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरेल
दुष्काळी परिस्थितीवर प्रभावी उपाय
भविष्यातील सिंचनासाठी शाश्वत जलसाठा निर्माण होईल.

### मोहिमेला लोकसहभागाची गरज

यावर्षी जिल्ह्यात १ लाख जलतारा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी लोकसहभाग देखील महत्वाचा आहे. नाम फाउंडेशन आणि इतर सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन सहकार्याची तयारी दाखवली आहे. या मोहिमेमुळे पाणीटंचाईवर मात होणार आहे. शेतकऱ्यांमध्ये जलसंवर्धनाबाबत जनजागृती होऊन दीर्घकालीन पाणीसाठा निर्माण होईल. प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या एकत्रित सहभागातून धाराशिव जिल्ह्यात जलव्यवस्थापनाचे काम करायचे आहे.

**कीर्ती किरण पुजार**
जिल्हाधिकारी.

## अर्ध्या दरात सोन्याचे आमिष देऊन ज्येष्ठ नागरिकाची 7 लाखांची फसवणूक

आरंभ मराठी । परंडा

अर्ध्या किमतीत २० तोळे सोने देण्याचे आमिष दाखवून ज्येष्ठ नागरिकाची तब्बल ७ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी काजल काळे, हमराज काळे व इतर दोन इसम यांनी दि. १ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास देवळाली-आरसोली रोडवर फिर्यादी भिकाजी वामनराव लोखंडे (वय ६८, रा. भोकरदन रोड, जाफराबाद, जि. जालना) यांना अर्ध्या दरात २० तोळे सोने देण्याचे आमिष दाखवले.आरोपींनी विश्वास संपादन करून फिर्यादींकडून ७ लाख रुपये घेतले. तसेच, फिर्यादी यांच्या पत्नीच्या गळ्यातील मणी-मंगळसूत्र पाहण्याच्या बहाण्याने तेही हातोहात घेतले. मात्र त्यानंतर आरोपींनी ना सोने दिले, ना घेतलेले पैसे व दागिने परत केले, आणि घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी भिकाजी लोखंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## १०८ नवउद्योजक मोहिमेला जोरदार प्रतिसाद; ६७० अर्ज, निवड प्रक्रिया आठवडाभर पुढे ढकलली

आरंभ मराठी । धाराशिव

जिल्ह्यातील तरुणांनी उद्योगाच्या दिशेने पाऊल टाकण्यास सुरुवात केल्याचे चित्र आहे. भाजपच्या '१०८ नवे उद्योजक' या उपक्रमाला जिल्हाभरातून अपेक्षेपेक्षा मोठा प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत ६७० अर्ज दाखल झाले आहेत. या मोठ्या प्रतिसादामुळे अर्जांची छाननी सुरू असून अंतिम निवड प्रक्रिया आता आठवडाभर पुढे ढकलण्यात आली आहे, अशी माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.नोकरीच्या शोधात भटकण्याऐवजी तरुणांनी स्वतः उद्योग उभा करावा आणि इतरांना रोजगार द्यावा. त्यासाठी जिल्हा भाजपच्या माध्यमातून ही संकल्पना राबवली जात आहे. निवड झालेल्या १०८ उद्योजकांना



केवळ सल्ला न देता प्रत्यक्ष उद्योग उभा राहीपर्यंत साथ दिली जाणार आहे.उद्योगासाठी लागणारे परवाने, बँक कर्ज, शासकीय अनुदान, तांत्रिक प्रोजेक्ट रिपोर्ट (DPR) तयार करणे, तसेच उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देणे, या सगळ्या बाबींमध्ये मदत केली जाणार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची सांगड घालून प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर दिला जाणार आहे.अर्जांची संख्या मोठी असल्याने निवड समितीसमोर निवडीचे आव्हान उभे राहिले आहे. पारंपारिक उद्योगांपेक्षा नव्या आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना प्राधान्य दिले जाणार आहे. कांदा पावडर, सोयाबीन प्रोटीन, मोरिंगा, मशरूम, मोती उत्पादन, रिसायकलिंग, बायोमास, सोलर, निर्माल्य व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांतील प्रस्ताव पुढे आले आहेत. पूर्वनियोजित १ मेची आढावा बैठक पुढे ढकलण्यात आली असून छाननीनंतर अंतिम १०८ उद्योजकांची यादी जाहीर केली जाणार आहे. त्यानंतर निवड झालेल्यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिर आयोजित केले जाईल.या उपक्रमातून जिल्ह्यात नव्या उद्योगांना चालना मिळेल आणि स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीला गती येईल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## तुळजाभवानी मंदिर परिसरात गर्दीचा फायदा घेऊन सोन्याची चोरी

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरातील तुळजाभवानी मंदिर परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने महिलेचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. याबाबत तुळजापूर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. फिर्यादी प्रतिक्षा प्रशांत पौळ (वय 26, रा. शेटफळ (नागोबाचे), ता. करमाळा, जि. सोलापूर) या दिनांक 1 मे 2026 रोजी दुपारी नातेवाईकांसह तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी आल्या होत्या. दर्शनानंतर त्या मंदिर परिसरातील आरती पॉईंट येथे थांबलेल्या असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सुमारे 14.500 ग्रॅम वजनाचे मिनी गंठन असा एकूण 43,500 रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी प्रतिक्षा पौळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भा.न्या. सं. कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत सोन्याचे गंठण लंपास

आरंभ मराठी । कळंब

कळंब येथील बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने महिलेचे सोन्याचे गंठण लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी शंकुतला भगवानदास खंडेलवाल (वय 60 वर्षे, रा. युसुफ वडगाव, ता. केज, जि. बीड) या दिनांक 29 एप्रिल 2026 रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास कळंब येथील बसस्थानकावर पंढरपूर ते पुसद या एसटी बसमध्ये चढत होत्या. यावेळी बसस्थानकावर मोठी गर्दी असल्याचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सुमारे 11 ग्रॅम वजनाचे, अंदाजे 1 लाख 38 हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण चोरून नेले.या घटनेप्रकरणी शंकुतला खंडेलवाल यांनी दिनांक 1 मे 2026 रोजी कळंब पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, त्यांच्या फिर्यादीवरून भा.न्या.सं. कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास कळंब पोलीस करीत आहेत.

आरंभ मराठी

## जिल्ह्याचा एकूण 88.59 टक्के तर विज्ञान शाखेचा सर्वाधिक निकाल

# धाराशिव जिल्ह्यात बारावीच्या निकालात मुलींची आघाडी

आरंभ मराठी । धाराशिव

**फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी परीक्षेचा धाराशिव जिल्ह्याचा निकाल जाहीर झाला असून यंदाही मुलींनी मुलांपेक्षा सरस कामगिरी करत आघाडी कायम राखली आहे. विज्ञान, कला आणि वाणिज्य या तिन्ही शाखांमध्ये समाधानकारक निकाल लागला असून एकूण जिल्ह्याचा निकाल ८८.५९ टक्के नोंदवला गेला आहे. दुपारी एक वाजता निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांनी जल्लोष केला. निकालानंतर मिठाईच्या दुकानात देखील पेढे घेण्यासाठी गर्दी झाली होती. काही विद्यार्थ्यांना अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्यामुळे काही ठिकाणी निराशा दिसत होती. मात्र यावेळी ग्रामीण भागात देखील चांगला निकाल लागल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे.**

### विज्ञान शाखेत दमदार निकाल

विज्ञान शाखेत एकूण ८४११ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ८३६३ विद्यार्थी परीक्षेला बसले आणि ८०४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या शाखेचा निकाल ९६.१८ टक्के इतका लागला असून मुलींचा निकाल (९७.९५%) मुलांच्या (९४.४४%) तुलनेत अधिक आहे.



### कला शाखेचा निकाल समाधानकारक

कला शाखेत ५५३१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५३५३ विद्यार्थी परीक्षेला बसले आणि ४१८८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या शाखेचा एकूण निकाल ७८.२३ टक्के लागला. मुलींचा निकाल ८८.३४% तर मुलांचा ७०.७१% इतका आहे.

### तालुकानिहाय निकाल

तालुकानिहाय निकालात धाराशिव तालुक्याचा निकाल ९१.६९% इतका सर्वाधिक आहे. त्यापाठोपाठ कळंब (९०.२५%), भूम (९०.८०%) आणि परंडा (८७.३०%) या तालुक्यांनी चांगली कामगिरी केली आहे. लोहरा तालुक्याचा निकाल तुलनेने कमी म्हणजे ७७.६६% नोंदवला गेला.

### एकूण जिल्ह्याचा आढावा

**नोंदणीकृत विद्यार्थी : १५,९९०**
**प्रत्यक्ष परीक्षेला बसलेले : १५,७१५**
**उत्तीर्ण विद्यार्थी : १३,९२३**
**एकूण निकाल : ८८.५९%**
**मुलांचा निकाल : ८३.९४%**
**मुलींचा निकाल : ९४.१७%**

### वाणिज्य शाखेत चांगली कामगिरी

वाणिज्य शाखेत १४१८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १३९५ विद्यार्थी परीक्षेला बसले आणि ११८८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या शाखेचा निकाल ८५.१६ टक्के असून मुलींचा निकाल (९१.५८%) मुलांच्या (८०.०५%) तुलनेत अधिक आहे.

## पाच केंद्रावर आज नीट परीक्षेचे आयोजन

### १९०२ विद्यार्थी देणार परीक्षा

आरंभ मराठी । धाराशिव

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (NTA),नवी दिल्ली यांच्या वतीने वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठीची NEET (UG)-२०२६ परीक्षा आज धाराशिव जिल्हा केंद्रावर आयोजित करण्यात आली आहे. दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत परीक्षा होणार असून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सायंकाळी ६ वाजेपर्यंत अतिरिक्त वेळ देण्यात येणार आहे.धाराशिव येथील पाच उपकेंद्रांवर एकूण १,९०२ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत. धाराशिव शहरातील शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद कन्या प्रशाला, श्रीपतराव भोसले हायस्कूल आणि रामकृष्ण परमहंस महाविद्यालय या पाच केंद्रांवर एकूण १९०२ परीक्षार्थी परीक्षा परीक्षा देणार आहे. सर्वाधिक ७२० परीक्षार्थी श्रीपतराव भोसले हायस्कूल येथे, तर ४८० परीक्षार्थी रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात परीक्षा देणार आहेत. राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत नियुक्त सेवापुरवठादार संस्थेकडून परीक्षार्थ्यांची सुरक्षा तपासणी,गर्दी व्यवस्थापन आणि प्रवेश प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्यात येणार आहे.परीक्षार्थ्यांची बुबुळ ओळख, चेहरा ओळख प्रणालीद्वारे बायोमेट्रिक उपस्थिती नोंदविण्यात येणार असून संपूर्ण परीक्षा प्रक्रियेवर सीसीटीव्हीद्वारे देखरेख ठेवली जाणार आहे. परीक्षेच्या पार्श्वभूमीवर आज सकाळी ७ ते सायंकाळी ७ या कालावधीत सर्व परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू राहतील.परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, पानपट्ट्या,टायपिंग सेंटर,एसटीडी बूथ,इंटरनेट कॅफे,ध्वनीक्षेपक आदी सेवा बंद ठेवण्यात येणार आहेत. परीक्षार्थी,नियुक्त अधिकारी-कर्मचारी आणि संबंधित शैक्षणिक संस्थांचे कर्मचारी यांनाच प्रवेश दिला जाणार असून नातेवाईकांनाही प्रवेश असणार नाही.

# वडील..न बोलणारा सागर,न दिसणारा पाया आणि आयुष्याचा खरा आधार

अमोलसिंह दत्तूसिंह चंदेल
शिराढोण.



माणसाच्या आयुष्यात काही गोष्टी अशा असतात, ज्यांचं महत्त्व आपण जिवंतपणी पूर्णपणे समजून घेत नाही. त्या शांतपणे आपल्या सोबत असतात, आपल्यासाठी जगत असतात, आणि आपण मात्र त्यांची सवय करून घेतो. वडील हे असंच एक व्यक्तिमत्त्व आहे ज्यांची किंमत अनेकांना त्यांच्या असण्यापेक्षा त्यांच्या नसण्याने अधिक जाणवते.वडील म्हणजे काय? हा प्रश्न सोपा वाटतो, पण त्याचं उत्तर खूप खोल आहे. वडील म्हणजे फक्त घर चालवणारी व्यक्ती नाही ते घराचा पाया असतात. वडील म्हणजे कठोर आवाजात बोलणारे, पण मनाने अत्यंत कोमल असणारे. ते कधीच आपल्या भावना उघड करत नाहीत, पण त्यांच्या प्रत्येक कष्टात प्रेम दडलेलं असतं. ते आपल्या मुलांसाठी आयुष्यभर झिजतात, पण कधीच मी तुझ्यासाठी इतकं केलं असं सांगत नाहीत.आज माझे वडील स्व. दत्तूसिंह महावीरसिंह चंदेल यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांची आठवण करताना मनात असंख्य आठवणी दाटून येतात. 2021 चा कोरोना काळ आजही मनाला हादरवून जातो. माझे वडील आजारी पडले आणि त्या क्षणापासून माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी लढाई सुरू झाली. एक मुलगा म्हणून मी त्यांच्या उपचारासाठी जे काही करता येईल ते सर्व करत होतो. दवाखान्यात बेड मिळवण्यासाठी केलेली धावपळ, डॉक्टरांशी सतत संपर्क, प्रत्येक रिपोर्टकडे लागलेली नजर हा काळ शब्दांत मांडणं कठीण आहे.त्या काळात माझे मार्गदर्शक आदरणीय चंद्रसेन (बाबा) देशमुख सर यांनी दिलेली साथ ही माझ्यासाठी आशेचा किरण ठरली. कोणत्याही रुग्णालयात बेड मिळत नव्हते त्यांनी त्या काळात बेड मिळवून देण्यापासून ते उपचारासाठी केलेली वैयक्तिक मदत ही अविस्मरणीय आहे.केवळ मदत नाही नाही, तर एक माणूस म्हणून, एक कुटुंबीय म्हणून माझ्या पाठीशी उभं राहून मला धीर दिला. जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जात होती, तेव्हा त्यांनी दिलेला आधार हा आयुष्यभर लक्षात राहणारा आहे. संकटात उभं राहणं म्हणजे काय,




हे त्यांनी कृतीतून दाखवून दिलं.मी माझ्या वडिलांसाठी सर्व प्रयत्न केले पण नियतीसमोर शेवटी हार मानावी लागली. त्या क्षणी एक गोष्ट मनात कायमची कोरली गेली वडील असतात तोपर्यंत आपण मजबूत असतो, आणि ते नसतात तेव्हा आयुष्याचा आधारच हरवतो.आजच्या काळात मला सर्वात जास्त जे जाणवतं, ते म्हणजे आपण वडिलांना "गृहित" धरायला लागलो आहोत. ते आहेत, म्हणून आहेत ते कायमच असतील, असं आपल्याला वाटत राहतं. पण आयुष्याचा नियम वेगळाच असतो ज्यांची सवय लागते, त्यांचंच अचानक निघून जाणं सर्वात जास्त वेदना देतं.आजची तरुण पिढी खूप पुढे जात आहे तंत्रज्ञानात, करिअरमध्ये, जीवनशैलीत. पण या सगळ्या प्रगतीमध्ये एक गोष्ट मागे पडते आहे नात्यांची जपणूक. विशेषतः वडिलांसोबतचं नातं.आज वडिलांचा फोन हा फक्त एक कॉल राहिला आहे.स्क्रीनवर बाबा, अण्णा, पिताजी, डॅडी असे नाव दिसतं पण आपण तो कॉल उचलत नाही "आत्ता नाही, नंतर बोलतो" असं म्हणत आपण पुढे निघून जातोपण त्या फोनच्या मागे काय असतं?तो फक्त कॉल नसतो तो त्यांच्या मनातली काळजी असते तो तू ठीक आहेस ना.. कुठे आहे, घरी कधी येणार आहे ?असे साधे आणि काळजीचे प्रश्न असतात तो एकटेपणातून बाहेर पडण्याचा त्यांचा प्रयत्न असतोवडील कधीच जास्त अपेक्षा ठेवत नाहीत. त्यांना तुमच्याकडून काही मागायचं नसतंत्यांना फक्त एवढंच हवं असतं तुम्ही त्यांच्याशी दोन मिनिटं बोलावं. पण आपण त्या दोन मिनिटांसाठीही वेळ काढत नाहीआणि एक दिवस असा येतो तो फोन कायमचा बंद होतो आणि मग आपण कॉल करतो पण तिकडून आवाज येत नाही त्या क्षणी जे रिकामेपण जाणवतं, ते आयुष्यभर भरून निघत नाही.माझ्या आयुष्यात हा अनुभव आलेला आहे म्हणूनच आज प्रत्येक तरुणाला मनापासून सांगतो...तुमच्या आयुष्यात कितीही व्यस्त असलात, तरी वडिलांसाठी वेळ काढा.त्यांच्याशी बोला त्यांच्या जवळ बसा त्यांच्या अनुभवातून शिका कारण वडील हे फक्त एक नातं नाहीत ते तुमचं अस्तित्व आहेत.तुम्ही कितीही मोठे झालात, तरी त्यांच्या नजरेत तुम्ही नेहमी लहानच राहता.तुमचं यश पाहून त्यांना जो अभिमान वाटतो, तो जगात कोणीही देऊ शकत नाही. आज माझे वडील माझ्यासोबत नाहीत पण त्यांच्या आठवणी, त्यांची शिकवण, त्यांचं निःस्वार्थ प्रेम हेच माझं आयुष्य जगण्याचं बळ आहे. आजच्या तरुण पिढीला शेवटी एवढंच सांगावंसं वाटतं.. मोठं व्हा, यशस्वी व्हा पण तुमच्या वडिलांना विसरू नका. त्यांच्या कष्टांची कदर करा त्यांच्या प्रेमाला प्रतिसाद द्या कारण, वडील हे नातं नसून एक संपूर्ण जग असतं आणि ते जग एकदा हरवलं, की परत कधीच मिळत नाही या निमित्ताने माझे प्रिय पिताजी यांना भावपूर्ण श्रद्धांजली

# १०१ व्या दिवशी तरी मराठी बोलतील का ?



परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षा चालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याच्या निर्णयाला अखेर सरकारने शंभर दिवसांची मुदतवाढ दिली. आगामी शंभर दिवसात जर परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी बोलता आली नाही तर त्याचा परवाना रद्द करण्यात येईल असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. परप्रांतीय रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी १०० दिवसांची मुदत दिल्यानंतर हा वाद तूर्त शांत झाला असला तरी प्रश्न पडतो की जे परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालक अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी शिकले नाही ते अवघ्या १०० दिवसात मराठी शिकतील का? मराठी शिकण्याची या परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांची मानसिकता आहे का ? आणि जर त्यांची मराठी मानसिकताच नसेल तर १०० दिवस काय १०० वर्षांची मुदत दिली तरी ते मराठी शिकणार नाहीत आणि जर ते १०० दिवसात मराठी शिकले नाही तर १०१ व्या दिवशी सरकार त्यांचे परवाने खरोखरच रद्द करेल का? की त्यांच्या मुजोरीला बळी पडून पुन्हा मुदत वाढ देईल? वास्तविक जे परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालक अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी शिकू शकले नाहीत ते अवघ्या १०० दिवसात मराठी शिकतील ही अपेक्षा करणेच चूक आहे. अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी न शिकणाऱ्या या मुजोर रिक्षा, टॅक्सी चालकांवर कारवाई व्हायलाच हवी. पण सरकार त्यांच्याकडे मतपेटी म्हणून पाहते. मतपेटीच्या जोरावरच ते महाराष्ट्रात राहूनही मराठीला तुच्छ लेखतात आणि मराठी शिकण्यास नकार देतात. मतपेटीच्या जोरावरच ते मुजोरी करून सरकारलाही जेरीस आणतात. काही राजकीय नेतेही स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी या मुजोर परप्रांतीय रिक्षा टॅक्सी चालकांची बाजू घेतात हे मराठी आणि महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. आपल्या राज्यातील राजकीय नेत्यांनी दक्षिण भारतातील राज्यांचा आदर्श घ्यायला हवा. दक्षिण भारतातील राज्ये, राजकीय नेते आणि तेथील नागरिक त्यांची प्रादेशिक अस्मिता जपण्यासाठी जीवाचे रान करतात. दक्षिणात्य राज्यात परप्रांतीयांची मुजोरी खपवून घेतली जात नाही. दक्षिणात्य राज्यात रोजगारासाठी जाणाऱ्या परप्रांतियांना आधी तेथील स्थानिक भाषा शिकावीच लागते कारण तेथील नागरिक स्थानिक भाषेतच बोलतात. आपल्या राज्यात मात्र आपणच हिंदी भाषेत बोलतो मग हे परप्रांतीय मराठी भाषा का शिकतील? जर आपण या परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांशी मराठीत बोललो तर त्यांना स्वतःच्या पोटासाठी मराठी बोलावेच लागेल. सरकार या परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकण्यास मुदतवाढ देऊ अगर न देऊ मराठी भाषकांनी या परप्रांतीय चालकांशी मराठीतच बोलावे. जर परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांनी मराठी बोलण्यास नकार दिला तर त्या रिक्षा, टॅक्सीतून प्रवासच करू नये. असे केले तरच हे मुजोर रिक्षा, टॅक्सी चालक मराठी शिकतील आणि मराठीतून बोलतील.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# मृत्यूचा पुरावा म्हणून चक्क मृतदेह का आणावा लागला?

किशोर जाधव,
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१



२६ जानेवारी, आपल्या प्रजासत्ताक दिनी, ओडिशामधील क्योंजार जिल्ह्यातील मलीपोसी गावाजवळील जंगलात राहणाऱ्या कालरा मुंडा या आदिवासी महिलेचे निधन झाले. ती ५६ वर्षांची होती. तिचा एकुलता एक मुलगाही काही वर्षांपूर्वीच मरण पावला होता. ५० वर्षांचा जितू मुंडा हा तिचा भाऊ आणि एकमेव नातेवाईक होता.बहिणीचे क्रियाकर्म जितूनेच पार पाडले. त्याने तिचे दफन केले. या क्रियाकर्मासाठी त्याच्याकडील सर्व पैसे खर्च झाले. या भावंडांकडे एक म्हैस होती; कालराने मरण्यापूर्वी ती विकली होती आणि त्यातून तिचा दवाखान्याचा खर्च भागवला होता. काही पैसे तिने बँकेत ठेवले होते, त्यातील काही आधीच खर्च झाले होते. काही दिवसांनी जितूला पैशांची गरज भासू लागली. तो मलीपोसी येथील ओडिशा ग्रामीण बँकेच्या शाखेत गेला. बहिणीच्या खात्यातील वीस हजार रुपये मिळावेत, यासाठी त्याने सर्व हकीकत सांगितली. मात्र, बँक कर्मचाऱ्यांनी शासकीय नियमांची अट त्याच्यासमोर ठेवली. बहिणीचा मृत्यू दाखला त्याला काही कारणांमुळे मिळवता आला नव्हता. जितूला पैशांची अत्यंत गरज होती, पण बँकेतील कर्मचारी नियमांवर बोट ठेवून त्याला परत पाठवत होते. अखेरीस त्याची सहनशक्ती संपली. त्याने बहिणीला जिथे दफन केले होते ती जागा उकरून तिचा मृतदेह बाहेर काढला. प्लास्टिकच्या पोत्याने तिचे तोंड झाकले, तिला खांद्यावर घेतले आणि भर उन्हात, अनवाणी पायाने गावाकडे निघाला. त्याच्या खांद्यावर बहिणीचा मृतदेह पाहून कोणीतरी व्हिडिओ बनवला, आणि तो काही क्षणांतच संपूर्ण देशभर व्हायरल झाला. यावेळी मात्र या व्हिडिओचा सकारात्मक परिणाम झाला. प्रशासन त्वरित जागे झाले आणि जितूला त्याचे पैसे मिळवून देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पोलिसांच्या उपस्थितीत कालरा मुंडा हिचा मृतदेह पुन्हा दफन करण्यात आला. वीस हजार रुपयांसाठी बहिणीचा मृतदेह उकरणारा जितू आणि साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या "स्मशानातील सोनं" या कथेमधील भीमा—हे दोघे जणू एका जातकुळीतले असल्याचे जाणवले. आपल्या शासकीय कार्यालयांतील कामकाजाची पद्धत पूर्णतः कागदोपत्री पुराव्यावर आधारित आहे, आणि ती अत्यंत ताठर आहे. एखाद्या योजनेत शासनाने थोडी लवचिकता आणली, की काही धूर्त लोक त्याचा गैरफायदा घेतात; परिणामी व्यवस्था पुन्हा कडक केली जाते. याचा सर्वाधिक फटका तळागाळातील सामान्य माणसाला बसतो. कागदपत्रांची यादी देऊन लाभार्थ्याला फाईल तयार करण्यास सांगितले जाते. एकेक कागद गोळा करता करता त्याची चप्पल झिजते. मनस्ताप, अपमान आणि लाचारी सहन करावी लागते. शेवटी तो मानसिकदृष्ट्या खचतो. पात्र असूनही कागदपत्रांच्या अभावामुळे तो अपात्र ठरतो आणि योजनेवर पाणी सोडतो. उलट, काही अपात्र लोक कागदोपत्री फेरफार करून योजनांचा लाभ घेतात.

जन्म आणि मृत्यू दाखले ही माणसाच्या जीवनातील पहिली आणि शेवटची कागदपत्रे आहेत. मागील शैक्षणिक वर्षात पारधी समाजातील काही मुलांना आधारकार्ड नसल्यामुळे इयत्ता पहिलीत प्रवेश नाकारण्यात आला होता. आधारकार्डसाठी जन्म दाखला आवश्यक; पण भटक्या समाजातील मुलांच्या जन्माची नोंद कुठेच नसते. त्यामुळे जन्म दाखला मिळवण्याची प्रक्रिया इतकी किचकट ठरते की पालक त्यातून माघार घेतात."पोट भरायचं की कागद गोळा करत फिरायचं?"—हा त्यांचा साधा प्रश्न व्यवस्थेला समजत नाही. जन्म दाखला नाही, म्हणून आधार नाही; आणि आधार नाही, म्हणून शिक्षण नाही—ही परिस्थिती स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही उद्भवली , ही खरोखरच शोकांतिका आहे. ओडिशातील या घटनेतही मृत्यू दाखला काढण्याची प्रक्रिया समजावून सांगितली गेली नाही, किंवा आवश्यक मदत मिळाली नाही. परिणामी, जितूला टोकाचे पाऊल उचलावे लागले. प्रत्येक व्यवस्थेत पर्यायी मार्ग असतात; ते समजावून सांगणे हे कर्तव्यदक्ष शासकीय कर्मचाऱ्यांचे काम आहे.आज शासकीय नोकऱ्यांसाठी कठीण स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणारे अनेक कर्मचारी नोकरीत रुजू झाल्यानंतर नैतिकतेच्या परीक्षेत मात्र अपयशी ठरतात. अशा वृत्तीमुळे सामान्य नागरिकांना न्याय मिळत नाही आणि संपूर्ण यंत्रणा बदनाम होते. शेवटी, नियमांच्या कठोर चौकटीत माणुसकी पुन्हा पुन्हा गुदमरू नये यासाठी प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यांनी झटले पाहिजे.

# सुट्टीत मुलांना सक्षम करुया

परीक्षा झाली की मुलांना उन्हाळा सुट्टी लागते. मुलांसाठी सुट्टी म्हणजे मौजमस्ती आणि आनंदाची पर्वणी असते.सुट्टीत मुले भरपूर खेळतात.कारण परीक्षा, अभ्यास या गोष्टींपासून त्यांना मोकळीक मिळालेली असते.सुट्टीत मुलांकडे भरपूर मोकळा वेळ असतो.या वेळेचा आपण चांगला उपयोग केला तर मुलांना सुट्टीच्या आनंदाबरोबरच नवीन गोष्टी शिकता येतात.यामुळे मुलांच्या ज्ञानात भर पडते.त्यांच्या अंगी असणारी विविध कौशल्ये विकसित होतात.मुलांची निर्णयक्षमता वाढते.मुले धाडसी,कणखर आणि स्वावलंबी बनतात. यासाठी पालकांनी जाणीवपूर्वक मुलांसाठी वेळ काढला पाहिजे. योग्य नियोजन केले तर सुट्टीचा वेळ मुलांसाठी खूप फायदेशीर ठरु शकतो.

1.मुलांना सकाळी लवकर उठण्याची सवय लावा.मोकळया हवेत फिरायला घेऊन जा.योगा,ध्यान धारणा करण्याची सवय लावा. शारीरिक तंदुरुस्ती आवडते व्यायामप्रकार करायची सवय लावा.
2.घरातील त्यांना करता येणारी कामे करण्याची जबाबदारी सोपवा.जेणेकरून त्यांना श्रमप्रतिष्ठा स्वावलंबन या गोष्टीची जाणीव होईल.
3.वेळ काढून नातेवाईक,स्नेही, मित्रमंडळींशी आवर्जून भेटवा.वेगवेगळया



विषयावर त्यांच्याशी गप्पा मारा.मुलांचा आत्मविश्वास आणि संवाद कौशल्य वाढेल.
4.बाजार,बँका,दुकाने, विविध व्यावसायिक येथील व्यवहार पाहू द्या.तसेच सरकारी कार्यालये याठिकाणी मुलांना घेऊन जा.तेथील कामकाजाची ओळख करून द्या.
5.परिसरातील शेतक-याच्या शेतीवर भेट देऊन मुलांना शेती,शेतकरी यांची ओळख करुन द्या. त्यांच्याशी बोलून शेतीविषयी माहिती द्या.
6.परिसरातील विविध करागीर उदा. चित्रकार, शिल्पकार, मूर्तीकार यांची भेट घ्या. त्यांच्या कलेची माहिती जाणून घ्या.
7.मुलांचे छंद जोपासा.उदा.पोहणे, चित्र काढणे,रांगोळी काढणे,कागद काम,हस्तकला,गायन नृत्य,अभिनय ,विविध वाद्ये वाजविणे,कॅरम, बुद्धीबळ ,सायकल तसेच त्यांच्या आवडीचे खेळ यात त्यांना गुंतवा.
८.वाचनाची गोडी लागण्यासाठी रोज २०मिनिटे तरी गोष्टीची तसेच छोटी चरित्रपर पुस्तके वाचायला द्या.वर्तमानपत्रे वाचनाची सवय लावा.
९.परिसरातील गड कोट किल्ले, जुने वाडे,मंदिरे,ऐतिहासिक वास्तू, संग्रहालये मुलांना दाखवा.
10.परिसरातील विविध क्षेत्रात नाव कमविलेली माणसे उदा.खेळाडू,शास्त्रज्ञ, लेखक, कवी,वक्ते,उद्योजक, डॉक्टर इत्यादी लोकांच्या छोट्या मुलाखती घेण्याचा प्रयत्न करावा.
11.मुलांची निर्णयक्षमता विकसित होण्यासाठी छोट्या गोष्टीत त्यांच्याशी बोला.त्यांना विचारात घ्या.
12.परिसरातील ज्ञानवृद्धी करणा-या उपक्रमात उदा.व्याख्याने,सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला ,नाटके यात आपल्या सोबत मुलांना घेऊन जा.त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला उपयुक्त ठरेल.
13.संध्याकाळी ऊन कमी झाल्यावर अंगातून घाम येईपर्यंत मनसोक्त खेळू द्या.
14.शक्य होईल त्यावेळी पारंपरिक खेळ उदा. विटीदांडू,गोटया,लगोरीयांचा अनुभव द्या.
15.आपल्या पाल्याला सक्षम करण्यासाठी आपला बहुमूल्य वेळ द्या.वेळ निघून गेल्यावर काहीच करता येत नाही.

लक्ष्मण जगताप
बारामती
लेखक शिक्षक आहेत.

# छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा




आरंभ मराठी । पळसप

मुरुड येथील श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कै. गोरोबा (काका) झाडके यांच्या ध्येयपूर्तीच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या या संस्थेत कार्यक्रमाला विशेष उत्साहाचे वातावरण होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मण दाताळ, संतोष धायगुडे व परशुराम राजुरे उपस्थित होते. तसेच संस्थेचे सचिव प्रा. दत्तात्रय जाधव, मुख्याध्यापक बाबू थॉमस, उपमुख्याध्यापक उमेश कुंभार आणि समन्वयक रामेश्वर शेटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर ध्वजावंदन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व अधोरेखित केले, तर प्रा. दत्तात्रय जाधव यांनी महाराष्ट्र राज्य निर्मितीचा इतिहास सांगत उपस्थितांमध्ये प्रेरणा व उत्साह निर्माण केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीदेवी माशाळकर यांनी मांडले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वैशाली देशमुख आणि शांती मार्डी यांनी केले. या कार्यक्रमाला प्रशांत कुलकर्णी, उमेश मारकड, बालाजी भिसे, आदित्य सिंग, सौरभ चव्हाण, रंजीत राऊत यांच्यासह बबीता गिरी, गीता फेरे, संगीता बिटले, अर्चना पाटील, ज्योती वांगसकर, जयश्री जाधव, अश्विनी नाडे, पूजा चव्हाण, महादेवी देशमुख, रेश्मा कुंभार, आकांक्षा लोमटे, संध्या माळी, ज्योती ढेकणे, उषा नाईकनवरे, रत्नप्रभा देशमुख, सन्ना पठाण, बबीता सिंग, प्रिया बोराडे, श्रद्धा शितोळे, प्रतीक्षा गौरशेट्टे, श्रद्धा उपाडे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

## विविध वृत्त

# महाराष्ट्र दिनी जनता विद्या मंदिर येथे गुणवंतांचा गौरव



**आरंभ मराठी । मुरूड**

मुरूड येथील रुरल एज्युकेशन सोसायटीच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या जनता विद्या मंदिर, मुरुड येथे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे सहसचिव विवेक पांगळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाली. यावेळी संस्थेचे सचिव विजय पाटील, प्रशासकीय अधिकारी अमर मोरे, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर शैक्षणिक वर्ष 2025-26 मधील पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. याच वेळी संस्थेच्या प्राथमिक विभागासाठी नव्याने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक डिजिटल क्लासरूमचे तसेच दृकश्राव्य स्वरूपातील शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी विकसित करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरचे उद्घाटन करण्यात आले. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणपद्धतीचा लाभ मिळणार असून त्यांच्या बौद्धिक व सर्जनशील विकासाला चालना मिळणार आहे.

# वाशी पंचायत समितीतील शिक्षण विस्तार अधिकारी विद्युलता टेकाळे यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

**आरंभ मराठी । वाशी**

पंचायत समिती वाशी येथील शिक्षण विभागात शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या विद्युलता टेकाळे यांनी प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेनंतर सेवापूर्तीचा टप्पा गाठला. त्यांच्या निवृत्ती निमित्त शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. टेकाळे यांनी कार्यकाळात वाशी तालुक्यातील शिक्षण क्षेत्राच्या गुणवत्तावाढीसाठी मोलाचे योगदान दिले. विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि शिक्षकांना सातत्याने मार्गदर्शन करत त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली. यावेळी गटशिक्षणाधिकारी सोमनाथ घोलप, शिक्षण विस्तार अधिकारी पारगाव बीट सुधाकर कोल्हे, केंद्रप्रमुख दत्तात्रय मोहिते, सिद्धेश्वर भालेकर, चौधरी, शहाजी शिंदे तसेच मुख्याध्यापक मोळवणे एस. बी., वाकडे एस. आर., जानगेवाड डी. एन., महामुनी एस. एस. यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत शुभेच्छा दिल्या.उपस्थितांनी टेकाळे यांचा शांत, संयमी व निगर्वी स्वभाव कायम स्मरणात राहील, असे मत व्यक्त केले. पुढील आयुष्यासाठी त्यांना निरोगी, आनंदी व समृद्ध जीवनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# देवधानोरा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**आरंभ मराठी । गोविंदपूर**



कळंब तालुक्यातील देवधानोरा येथे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात जयंती अध्यक्ष हिंमत वाघमारे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी त्रिशरण पंचशील ग्रहण करून अभिवादन केले. त्यानंतर संपूर्ण गावातून डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमाला अध्यक्ष हिम्मत वाघमारे, उपाध्यक्ष यश वाघमारे, खजिनदार अतुल मस्के, सचिव विशाल वाघमारे तसेच किरण वाघमारे, जय भीम वाघमारे, बालाजी वाघमारे, उत्तम वाघमारे, पार्श्वनाथ वाघमारे, सुधीर वाघमारे, तानाजी वाघमारे, अंकुश वाघमारे, चोकोबा वाघमारे, गोविंद वाघमारे यांच्यासह भीमनगर परिसरातील बौद्ध उपासक-उपासिका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# येणेगुर ग्रामपंचायत पोटनिवडणूकीत वार्ड 5 मधून अश्विनी हिप्परगे 113 मतांनी विजयी

**आरंभ मराठी । येणेगूर**



उमरगा तालुक्यातील येणेगुर ग्रामपंचायतीच्या वार्ड क्रमांक ५ मधील सदस्यपदाच्या पोटनिवडणुकीत तिरंगी लढतीत सौ. अश्विनी अप्पू हिप्परगे यांनी ११३ मतांच्या फरकाने विजय मिळवला. या निवडणुकीत अश्विनी सिद्धेश्वर हिप्परगे, प्रतिज्ञा सतीश गायकवाड आणि प्रतीक्षा आनंद गायकवाड यांच्यात चुरशीची लढत झाली. २८ एप्रिल रोजी झालेल्या मतदानात एकूण ९४७ मतदारांपैकी ४१२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर दि. २९ रोजी झालेल्या मतमोजणीत अश्विनी हिप्परगे यांना २४१ मते मिळाली, तर प्रतीक्षा गायकवाड यांना १२८ आणि प्रतिज्ञा गायकवाड यांना ३७ मते मिळाली. 'नोटा'ला ६ मते पडली. सर्वाधिक मते मिळाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अश्विनी हिप्परगे यांना विजयी घोषित केले. निकाल जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोषात विजयोत्सव साजरा केला.अश्विनी हिप्परगे यांचे पती अप्पू हिप्परगे हे राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार गट ) चे सक्रिय पदाधिकारी असून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

### आठ दिवस चालणार प्रक्रिया; कडक पोलीस बंदोबस्तात मूर्तीचे मूळ स्वरूप उजागर होणार

# माणकेश्वरच्या सटवाई मंदिरात मूर्तीवरील शेंदूर काढण्यास सुरुवात

## पुरातत्त्व विभागाची शास्त्रीय मोहीम सुरू

**आरंभ मराठी । भूम**

भूम तालुक्यातील माणकेश्वर येथील प्रसिद्ध सटवाई मंदिरात मुख्य देवीच्या मूर्तीवरील वर्षानुवर्षे साचलेला शेंदूर काढण्याच्या प्रक्रियेला अखेर अधिकृत प्रारंभ झाला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील पुरातत्त्व विभागाच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक आणि शास्त्रीय पद्धतीने पार पाडली जात असून, मंदिर परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मंगळवारी (दि. २८) सकाळपासून या कामास सुरुवात करण्यात आली. अनेक वर्षांपासून देवीच्या मूर्तीवर सातत्याने शेंदूर लावण्यात येत असल्यामुळे मूर्तीचे मूळ आणि प्राचीन स्वरूप झाकले गेले होते. त्यामुळे मूर्तीला तिचे ऐतिहासिक रूप परत मिळावे, यासाठी शेंदूर काढण्यात यावा, अशी मागणी भाविकांकडून सातत्याने केली जात होती.



या मागणीसाठी समाजसेवक तथा ह.भ.प. गणेश अंधारे महाराज यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबल्याने हा विषय अधिक चर्चेत आला. त्यांच्या आंदोलनानंतर प्रशासनाने याची दखल घेत गुरुवारी पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंदिराची पाहणी केली. सुरुवातीला मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष व पुजाऱ्यांनी तपासणीस विरोध दर्शविला होता; मात्र तज्ज्ञांनी शास्त्रीय व रासायनिक प्रक्रियेद्वारे शेंदूर काढणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केल्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू करण्यास मार्ग मोकळा झाला. छत्रपती संभाजीनगर येथील पुरातत्त्व विभागाच्या सहाय्यक संचालक जया वाहने आणि राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पुरातत्त्वज्ञ सागर मुंडे व त्यांच्या पथकाकडून हे काम हाती घेण्यात आले आहे. मूर्तीचे कोणतेही नुकसान होऊ नये, यासाठी अत्यंत सूक्ष्म व नियंत्रित रासायनिक पद्धतीचा वापर केला जात आहे. संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सुमारे आठ दिवसांचा कालावधी लागणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले, परंडा पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण शिरसाट यांच्यासह मोठा पोलीस बंदोबस्त मंदिर परिसरात तैनात करण्यात आला आहे. सध्या मंदिराच्या गाभाऱ्यात मुख्य मूर्तीवर प्रत्यक्ष काम सुरू असून, त्या ठिकाणी पुरातत्त्व विभागाच्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतरांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. भाविकांच्या धार्मिक भावना लक्षात घेऊन मंदिरासमोर सटवाई देवीची प्रतिकृती ठेवण्यात आली असून, सर्व पूजा-अर्चा त्या प्रतिकृतीवरच सुरू ठेवण्यात येत आहेत. या प्रक्रियेमुळे सटवाई देवीच्या मूर्तीचे मूळ आणि ऐतिहासिक स्वरूप पुन्हा उजागर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याचा समारोप

**आरंभ मराठी । धाराशिव**



पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणे ही काळाची गरज असून जलव्यवस्थापन ही केवळ शासकीय जबाबदारी नसून लोकचळवळ बनली पाहिजे. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनी 'जलतारा'सारखे उपक्रम राबवून भूजल पातळी वाढविण्यासाठी पुढाकार घ्यावा. जलसंवर्धनासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले. राज्यातील नागरिकांमध्ये जलसाक्षरता वाढवणे,पाण्याच्या बचतीचे महत्त्व पटवून देणे आणि शाश्वत जलव्यवस्थापन उपाययोजनांना चालना देण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात समारोप समारंभ गुरुवारी (दि.३०) जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. कार्यक्रमास जिल्हा कृषी अधीक्षक राजकुमार मोरे, जिल्ह्यातील जलदूत, जलप्रेमी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारोप प्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी पुजार यांनी जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या माध्यमातून समाजात पाण्याच्या सुयोग्य वापराबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. विशेषतः दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनी जलसंवर्धन उपक्रमांना प्राधान्य देत भूजल पातळी वाढविण्यासाठी शासनाच्या प्रयत्नांना सक्रिय सहकार्य करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा कृषी अधीक्षक राजकुमार मोरे यांनी ही मोहीम लोकाभिमुख असून समाजातील सर्व घटकांनी जलव्यवस्थापनासाठी सक्रिय सहभाग नोंदविणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यकारी अभियंता कल्याणी कालेकर यांनी प्रस्तावनेत जलसंपदा विभाग अधिक लोकाभिमुख करण्यासाठी तसेच पाटबंधारे महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी विभाग मिशन मोडवर कार्यरत असल्याची माहिती दिली.धाराशिव पाटबंधारे मंडळामार्फत पंधरवड्यात राबविण्यात आलेल्या विविध कार्यशाळा व उपक्रमांची माहिती देणारी चित्रफीतही यावेळी सादर करण्यात आली.जलसंवर्धन,पाणी बचत आणि शाश्वत जलनियोजनासाठी समाजात व्यापक जनजागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेला हा पंधरवडा धाराशिव जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात आला.

# गिरवलीत आरोग्य उपकेंद्राच्या नव्या इमारतीचे लोकार्पण

## आरोग्य सेवा होणार अधिक सक्षम




**आरंभ मराठी । भूम**

भूम तालुक्यातील गिरवली येथे नव्याने बांधण्यात आलेल्या आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्या शुभांगी सुनील देशमुख, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे, गिरवलीचे सरपंच संजय मोटे, ईट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी पन्हाळे, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सूरज मोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. गिरवली परिसरात सुसज्ज आरोग्य उपकेंद्राची इमारत व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून अनेक दिवसांपासून केली जात होती. अखेर या मागणीला यश मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नवीन इमारतीमुळे गिरवली व आसपासच्या गावांतील नागरिकांना अधिक सुलभ, जलद आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे परिसरातील आरोग्य समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या प्रसंगी अक्षय मोटे, सौरभ देशमुख, लक्ष्मण चव्हाण, रत्नदीप मोटे यांच्यासह उपकेंद्राचे कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आरंभ मराठी — मोफत प्रवासालाही अपवाद नाही; जेष्ठ नागरिकांनाही द्यावे लागणार अतिरिक्त शुल्क

# एसटी प्रवास महागला; 'स्वच्छता अधिभार' म्हणून प्रत्येक प्रवाशाकडून 2 रुपये वसुली

**सुभाष कुलकर्णी । आरंभ मराठी**

तेर - प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीद वाक्य घेऊन कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) कडून प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकण्यात येत असल्याने टीका होत आहे. प्रवाशांच्या सोयी-सुविधा वाढवण्याऐवजी 'स्वच्छता अधिभार निधी' या नावाखाली प्रत्येक तिकीटावर २ रुपये जादा आकारले जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यभरात १५ एप्रिलपासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या नव्या नियमांनुसार, कोणत्याही अंतराचा प्रवास असो, प्रत्येक प्रवाशाला तिकीटाच्या दराव्यतिरिक्त २ रुपये अतिरिक्त द्यावे लागणार आहेत. ही रक्कम वरकरणी कमी वाटत असली तरी दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी हा कायमस्वरूपी आर्थिक भार ठरत आहे. महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी लालपरी आता प्रवाशांच्या खिशाला कात्री लावत असल्याची भावना व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, राज्यातील जेष्ठ नागरिक, महिला, लहान मुले, स्वातंत्र्यसैनिक, दिव्यांग व्यक्ती तसेच त्यांच्या मदतनीसांना प्रवास भाड्यात सवलती मिळत असल्या तरी या सर्वांनाही 'स्वच्छता अधिभार' म्हणून २ रुपये देणे बंधनकारक करण्यात आले आहे. ७५ वर्षांवरील जेष्ठ नागरिकांनाही या शुल्कातून सूट देण्यात आलेली नाही. धाराशिव जिल्ह्यासारख्या ग्रामीण भागात एसटी सेवा आधीच अपुरी व गैरसोयीची असल्याचे चित्र आहे. धडधड वाजणाऱ्या काचा, सताड उघड्या खिडक्या, धूर ओकणाऱ्या बस, तसेच पावसाळ्यात गळती होणाऱ्या जुन्या गाड्या अशा समस्यांना प्रवाशांना सामोरे जावे लागते. तरीही सवलतीमुळे नागरिक पर्याय नसल्याने एसटीनेच प्रवास करतात.



### चालकाचा जीव धोक्यात घालून प्रवास

एसटी बस चालकांनाही अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक बसमध्ये समोरील दिवे व्यवस्थित नसल्याने रात्रीच्या वेळी वाहन चालवताना मोठा धोका निर्माण होतो. सध्या बहुतांश वाहनांमध्ये एलईडी लाईट्सचा वापर होत असताना एसटी बसमध्ये मात्र जुन्या पद्धतीचे दिवे असल्याने चालकांना समोरचे स्पष्ट दिसत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढत असून, महामंडळाने तातडीने बसमध्ये आधुनिक एलईडी दिवे बसवण्याची गरज व्यक्त केली जात आहे. एकीकडे प्रवाशांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असताना दुसरीकडे मूलभूत सुविधा सुधारण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने एसटी महामंडळाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# बाजारात 10, 20 आणि 50 च्या नोटांचा तुटवडा; व्यापारी आणि ग्राहक हैराण

## चिल्लर संकटामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था विस्कळीत

श्रीकांत अणदूरकर । आरंभ मराठी

**अणदूर – संपूर्ण समाजाचा व्यवहार असणाऱ्या 10, 20 आणि 50 च्या चलनी नोटा बाजारातून गायब झाल्या आहेत आणि ज्या आहेत त्या पूर्णपुणे डॅमेज म्हणजेच खराब झाल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील व्यापार, बाजार व इतर व्यवस्थापने प्रभावित झाली असून, अनेक ठिकाणी ग्राहक व व्यापारी यांच्यात वाद होताना दिसून येत आहेत. चलनात मुबलक प्रमाणात या चिल्लर नोटा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी केली जात असून, या गंभीर विषयाकडे संबंधित शासकीय अर्थ खात्याचे संपूर्णतः दुर्लक्ष होत आहे. दररोजच्या या चिल्लर प्रॉब्लेममुळे व्यापारी व ग्राहक वैतागले आहेत.**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेला बाजार सध्या या समस्येमुळे डळमळीत झाला असून सर्वच व्यापारी त्रस्त झाले आहेत. यावर काय उपाययोजना करावी हे त्यांना समजत नाही. अनेक नोटा चलनात फिरून फिरून आल्याने त्या जीर्ण व फाटक्या झाल्या आहेत. थोडी फाटकी अथवा रंग लागलेली नोट कोणीच घेत नसल्याने ग्राहक आणखीन अडचणीत आला आहे. व्यापारी या नोटा पिग्मी एजंट यांच्याकडे देत असले तरी ग्राहक कोणाकडे देणार याचे उत्तर कोणाजवळच नाही.

फाटक्या नोटा बदलून देण्याचे बँकेचे काउंटर सोलापुरात असल्याने ग्राहकांची आणखी तारांबळ उडत आहे. सरकारने 10,20,50 च्या नोटा मोठ्या प्रमाणात काढल्या असल्या तरी त्या कोठे जात आहेत हे स्पष्ट नाही. मंदिरे व देवस्थानांमध्ये ही नाणी मोठ्या प्रमाणात जमा होत असल्याने बाजारात ती उपलब्ध होत नाहीत. तसेच प्रत्येक घरात 'गल्ला बँक' असल्याने नाणी व चिल्लर घरातच साठवली जात असल्याचेही दिसून आले आहे. त्यामुळे बाजारात चिल्लरची तीव्र वानवा जाणवत आहे. या परिस्थितीत समाजातील जागरूक नागरिकांनी नाण्यांची बचत न करता मोठ्या नोटांची बचत करावी, तसेच सरकारने 10,20,50 ची नाणी मुबलक प्रमाणात व्यवहारात उपलब्ध करून द्यावीत, बँकांनी ओझ्याचे कारण न सांगता प्रत्येक नागरिकास चिल्लर नाणी द्यावीत, अशा उपाययोजनांद्वारे हे संकट दूर करता येऊ शकते. सरकार व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे असून चिल्लर नोटा व नाण्यांच्या तुटवड्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे, जेणे करून ग्रामीण भागातील व्यवहार सुरळीत होतील.



### ऑनलाईन पर्यायाचा उपयोग करावा

बाजारातील 10,20,50 रुपयांच्या चिल्लरच्या या संकटावर मात करण्यासाठी ऑनलाईन पेमेंट हा एक चांगला पर्याय उपलब्ध असून त्याचा काही प्रमाणात वापर होत आहे. मात्र भाजी विक्रेते, छोटे दुकानदार यांच्याकडे डिजिटल पेमेंटची सुविधा नसल्याने अडचणी येतात. तसेच महिला ग्राहक, लहान मुले व अनेक तरुणांकडेही डिजिटल व्यवहाराची साधने उपलब्ध नसल्याने समस्या कायम आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी डिजिटल पेमेंटचा वापर वाढवावा

**विजयकुमार कांबळे**
सेवानिवृत्त बँक अधिकारी.



### सगळ्याच ग्राहकांकडे सुट्टे पैसे नसतात

मी एक सामान्य भाजी विक्रेता असून सहा गावांचा आठवडी बाजार करतो. अणदूरचा बाजार मोठा असतो. चिल्लर समस्या ही बाजारातील फार मोठी समस्या आहे. ग्राहक 10 रुपयांची भाजी घेऊन 500 ची नोट देतात. चिल्लर नसल्याने ते दुसरीकडे जातात. त्यामुळे आम्हाला इतरांकडून हातापाया पडून सुट्टे पैसे आणावे लागतात, पण तेही अपुरे पडतात. ८० टक्के ग्राहकांकडे सुट्टे पैसे नाहीत.

**किरण पवार**
भाजीविक्रते, चव्हाणवाडी.

### चिल्लर नसल्याने आर्थिक नुकसान सोसावे लागते

औषध विक्री हा व्यवसाय नसून सेवा आहे. आमची बिले 12, 24, 36 रुपयांची असतात, पण ग्राहक 500 ची नोट देतात. त्यामुळे वैताग येतो. अनेक वेळा ग्राहक व दुकानदार यांच्यात वाद होतात. वरचे 2-5 रुपये सोडावे लागतात, त्यामुळे आर्थिक नुकसान होते. पान टपरीवाल्याकडून सुट्टे पैसे आणावे लागतात, पण तेही अपुरे पडतात. ही समस्या गंभीर आहे .

**गुणवंत मुळे**
औषधविक्रेते, अणदूर.

## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा



आरंभ मराठी । धाराशिव

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात दिनांक १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन अत्यंत उत्साहपूर्ण, प्रेरणादायी आणि देशभक्तीपर वातावरणात मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्याप्रांगणातसकाळीलवकरचविद्यार्थी,प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमापूजनाने झाली. त्यानंतर ध्वजारोहण, राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त ॲड. अशोक शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला सलामी देत देशभक्तीचा अभिमान व्यक्त केला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. राजश्री यादव यांनी केले. त्यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा इतिहास, १ मे १९६० रोजी झालेल्या राज्य निर्मितीचा प्रवास तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान यावर प्रकाश टाकला. तसेच कामगार दिनाचे महत्त्व अधोरेखित करत कामगारांच्या श्रमामुळे देशाच्या प्रगतीला मिळालेली गती स्पष्ट केली. यानंतर प्रमुख पाहुणे ॲड. अशोक शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. त्यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीत कामगारांचा असलेला अनमोल वाटा अधोरेखित केला. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी आभार प्रदर्शन करत प्रमुख पाहुणे, मान्यवर, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्याबद्दल आभार मानले.

## वैशाख पौर्णिमेला पारा येथे श्री कागदंबा देवीची भव्य यात्रा उत्साहात

आरंभ मराठी । पारा



वाशी तालुक्यातील पारा गावची कुलस्वामिनी व आराध्यदैवत असलेल्या श्री कागदंबा देवीची यात्रा शुक्रवारी (दि.१) वैशाख बुद्ध पौर्णिमा निमित्त मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडली. बीड-धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवर वसलेल्या या जागृत देवस्थानात दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. या देवस्थानाची आख्यायिका अत्यंत रंजक असून, कागासुर नावाचा राक्षस लोकांना त्रास देत असल्याने ग्रामस्थांनी देवीची आराधना केली. भक्तांच्या हाकेला धावून आलेल्या अष्टभुजा देवीने कागासुराचा संहार केला. त्यामुळे या देवीला "कागदंबा" हे नाव प्राप्त झाल्याची श्रद्धा आहे. या देवीची वर्षातून दोन वेळा यात्रा भरते. देवीच्या पालखीचा मान गावातील तेली (हिंगे) घराण्याकडे असून, पालखीचा मुक्काम पारंपरिकरित्या पानसे वाड्यात असतो. तेथून वाजत-गाजत व विधिवत पालखी मिरवणूक काढून देवीच्या गाभाऱ्यात आणण्यात आली. देवीचे माहेर डोंगरेवाडी येथे असल्याने यात्रेनिमित्त डोंगरेवाडीहून साडी-चोळीचा मान मोठ्या उत्साहात मंदिरात आणण्यात आला. यंदाच्या पूजा विधीचा मान बाबा धर्माधिकारी घराण्यास लाभला. त्यांनी विधिवत पूजा करून मंदिर भाविकांसाठी खुले केले. यात्रेनिमित्त विविध सेवाभावी उपक्रमही राबविण्यात आले. डोंगरेवाडीचे गणेश तात्या भराटे यांच्या वतीने भाविकांना मोफत चहा, शुद्ध जारचे पाणी व फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच पारा येथील कागदंबा गणेश मंडळाकडून भाविकांसाठी मोफत थंडगार पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यात्रेसाठी येणाऱ्या वाहनांची गैरसोय होऊ नये म्हणून जयंतराव पानसे यांनी स्वतःच्या शेतामध्ये वाहन पार्किंगची सुविधा उपलब्ध करून दिली. यावर्षी यात्रा मोठ्या प्रमाणावर भरली होती. बीड जिल्ह्यासह पारा, फक्राबाद, डोंगरेवाडी, सारोळा, लाखनगाव, पिंपळवाडी तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

## धाराशिवमध्ये महिला भजनी मंडळांची रंगतदार स्पर्धा; 24 संघांचा सहभाग

आरंभ मराठी । धाराशिव




शहरातील धाराशिव मित्र मंडळ व नारी शक्ती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित मोफत महिला भजनी मंडळ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण २४ भजनी मंडळांनी सहभाग नोंदवत स्पर्धा रंगली.स्पर्धेत रुक्मिणी महिला भजनी मंडळ, बँक कॉलनी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक जनाई महिला भजनी मंडळ, शांतिनिकेतन कॉलनी, तर तृतीय क्रमांक लक्ष्मी नारायण महिला भजनी मंडळ, सहकार्य कॉलनी यांनी मिळवला. चौथा क्रमांक ज्ञानेश्वरी महिला भजनी मंडळ, गणेश नगर, पाचवा क्रमांक पांडुरंग महिला भजनी मंडळ, गणेश नगर, सहावा क्रमांक रुक्मिणी महिला भजनी मंडळ, एस.टी. कॉलनी आणि सातवा क्रमांक जिजाऊ महिला भजनी मंडळ, जिजाऊ नगर यांना देण्यात आला.विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, विभीषण खामकर, तानाजी जाधव, ह.भ.प. भारत महाराज कोकाटे, ह.भ.प. योगेश बप्पा इंगळे, ह.भ.प. लक्ष्मण महाराज जगताप, ह.भ.प. मधुकर महाराज निंबाळकर, ह.भ.प. पांडुरंग गाडे महाराज, नगरसेविका सौ. गायत्रीताई दंडनाईक, नगरसेविका सौ. आकांक्षा वाघमारे व श्रीराम खामकर यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी संयोजक समितीचे सदस्य अशोक गायकवाड, श्रीराम खामकर, तानाजी जाधव, अशोक ठोंबरे, राजू तांबे, प्रदीप तांबे, विभीषण मोरे, गोविंद कोळगे, नवनाथ काळे, संजय शिंदे, हणमंत भालेकर, दशरथ थोरात, विजयकुमार पवार, रमेश भोसले, अर्जुन जाधव, अमोल निंबाळकर यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## स्व-गणना मोहिमेत पुढाकार घ्या

### ॲड. व्यंकटराव गुंड पाटील यांचे नागरिकांना आवाहन

आरंभ मराठी । धाराशिव



भारताची जनगणना २०२७ ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण प्रक्रिया असून, यामध्ये प्रथमच डिजिटल स्वरूपात 'स्व-गणना' (Self Enumeration) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अभिनव उपक्रमात जिल्ह्यातील नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक ॲड. व्यंकटराव गुंड पाटील यांनी केले आहे.ॲड. पाटील म्हणाले की, प्रशासनाने जनगणना प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख केली आहे. स्व-गणना सुविधेमुळे नागरिकांना घरबसल्या मोबाईल किंवा संगणकाच्या माध्यमातून आपली माहिती अचूकपणे नोंदविता येणार आहे. त्यामुळे वेळेची बचत होण्याबरोबरच माहिती अधिक विश्वासार्ह राहणार आहे.जनगणना ही केवळ माहिती संकलनाची प्रक्रिया नसून देशाच्या भविष्यातील विकास आराखड्याचा पाया आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, पायाभूत सुविधा यांसारख्या विविध क्षेत्रांतील योजना आखताना या माहितीचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो.तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवा किंवा चुकीच्या माहितीवर विश्वास न ठेवता शासनाच्या अधिकृत माध्यमांवरच अवलंबून राहावे आणि माहिती नोंदविताना आवश्यक ती दक्षता घ्यावी, असेही त्यांनी नमूद केले.दरम्यान, नागरिकांसाठी स्व-गणना करण्याची मुदत १ मे ते १५ मे अशी निश्चित करण्यात आली असून, या कालावधीत नागरिकांनी स्वतःची व कुटुंबाची अचूक माहिती ऑनलाइन भरावी. यासाठी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊन माहिती नोंदविता येणार आहे.

## शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयात पालक मेळावा उत्साहात

**भूम** :- भूम येथील शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी पालक-शाळा संवाद मजबूत करण्याच्या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संतोष शिंदे होते. यावेळी पर्यवेक्षक राम सोळंके व प्रा. गंगाधर काळे उपस्थित होते. प्राचार्यांनी बारावीचे महत्त्व, करिअरच्या संधी व स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करत पालकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा. धनश्री पिंपळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. चंद्रकांत शिंदे यांनी केले. मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## एकुरगावाडीत अवैध गुटखा साठा जप्त

**उमरगा** :- महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटखा व तत्सम तंबाखूजन्य पदार्थांची अवैध साठवणूक व विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगणाऱ्या व्यक्तीवर उमरगा पोलिसांनी कारवाई करत गुन्हा नोंदवला आहे. उमरगा पोलीस ठाण्याच्या पथकाने दि. 1 मे 2026 रोजी सकाळी एकुरगावाडी शिवारातील महामार्ग क्रमांक 548 बी रोडलगत असलेल्या महालक्ष्मी किराणा व जनरल स्टोअर्स येथे छापा टाकला असता, आरोपी शांतवीर संगप्पा घंटे (वय 38, रा. एकुरगा) याच्याकडे शासनाने बंदी घातलेला गुटखा व तत्सम पदार्थ आढळून आले. या कारवाईदरम्यान विमल पान मसाला, व्ही-1 टोबॅको आदी मिळून एकूण 4,080 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी संबंधित गुटखा साहित्य जप्त करून आरोपीविरुद्ध भा.न्या.सं. कलम 223, 274, 275 तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या कलम 59 अंतर्गत उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

दैनिक आरंभ मराठी | वारंवार खंडित वीजपुरवठा, कमी दाब आणि ट्रान्सफॉर्मर जळण्यावर शेतकऱ्यांचा संताप

## वीज समस्येवरून आमदार प्रवीण स्वामी आक्रमक, महावितरणला तात्काळ उपाययोजनांचे आदेश

आरंभ मराठी । मुरुम

**मुरूम शहर परिसरातील वाढत्या वीज समस्यांवर तोडगा काढण्यासाठी शनिवारी (ता.२) नगरपरिषद कार्यालयात महत्त्वपूर्ण तक्रार निवारण बैठक पार पडली. आमदार प्रवीण स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शेतकरी, नागरिक आणि पत्रकारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. बैठकीत वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाब, ट्रान्सफॉर्मर जळण्याच्या घटना आणि नवीन जोडण्यातील विलंब या गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. विशेषतः शेतीपंपांना अपुरा व कमी दाबाचा वीजपुरवठा मिळत असल्याने मोटारी जळून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे गाऱ्हाणे मांडण्यात आले.**



या पार्श्वभूमीवर आमदार प्रवीण स्वामी यांनी महावितरण अधिकाऱ्यांना तक्रारी तत्काळ नोंदवून वेळेत मार्गी लावण्याचे स्पष्ट निर्देश दिले. नागरिकांना वीजपुरवठ्यामुळे होणारा त्रास थांबवणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच महावितरणसमोरील अडचणींवर स्वतंत्र बैठक घेऊन कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, मुरूम शहरासाठी स्वतंत्र १३३ केव्ही उपकेंद्र उभारण्याची, उच्च दाबाने वीजपुरवठा सुरू करण्याची आणि वागदरी-आलूर वीजवाहिनीचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. केसर जवळगा येथे एकदिवसाआड होणारा वीजपुरवठा नियमित करण्यासह शेतीसाठी किमान ६ तास अखंड वीज देण्याची मागणीही जोर धरली. बैठकीत काही तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यात आले असून उर्वरित प्रश्नांवर लवकरच ठोस कार्यवाही करण्याचे आश्वासन महावितरण अधिकाऱ्यांनी दिले. या बैठकीमुळे शेतकऱ्यांमध्ये दिलासा व्यक्त होत असून, लोकप्रतिनिधी म्हणून मुरूममध्ये प्रथमच थेट संवाद साधल्याबद्दल आमदार प्रवीण स्वामी यांचे आभार मानण्यात आले.

## आपत्ती व्यवस्थापनाच्या बचावकार्याला मिळणार गती

### अत्याधुनिक वाहनांचे पालकमंत्र्यांनी केले लोकार्पण



आरंभ मराठी । धाराशिव

जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तींचा वाढता धोका लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,धाराशिव अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या अत्याधुनिक वाहनांचे पूजन व लोकार्पण १ मे रोजी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चना पाटील,माजी आमदार ज्ञानराज चौगुले,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,जिल्हा परिषद उपाध्यक्ष उषा गायकवाड, पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. जिल्ह्यात पूरस्थिती, दुष्काळ,आग किंवा इतर नैसर्गिक संकटांना वेगाने तोंड देण्यासाठी 'गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण' या योजनेअंतर्गत जिल्हा व तालुकास्तरावर आवश्यक साहित्य,यंत्रसामग्री आणि वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळाली देण्यात आली होती. शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती यांच्या निर्देशानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

# कळंबमध्ये ट्रान्सफॉर्मरला भीषण आग; ८ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर नियंत्रण, वीजपुरवठ्यावर परिणाम

**आरंभ मराठी । कळंब**



कळंब शहराला वीजपुरवठा करणाऱ्या येथील सबस्टेशनमधील ५ एमव्हीए क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरला शनिवारी दुपारी भीषण आग लागली. ट्रान्सफॉर्मरमध्ये सुमारे ४ हजार लिटर ऑईल असल्याने आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. सायंकाळपर्यंत आग नियंत्रणाबाहेर होती; मात्र विविध अग्निशमन दलांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे तब्बल आठ तासांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. आगीचे लोट इतके तीव्र होते की सबस्टेशनलगतच्या कळंब–येरमाळा मार्गापर्यंत त्याची झळ जाणवत होती. परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन कळंब, धाराशिव, केज, लोहारा नगरपरिषद तसेच रांजणी येथील नॅचरल शुगर कारखान्याच्या अग्निशमन दलांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत सुमारे ७० ते ८० फायर एक्सटिंग्विशरचा वापर केला; मात्र आग आटोक्यात येत नव्हती. अखेरीस डीसीपी पावडर मागवून मोठ्या प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणण्यात आली. दरम्यान, घटनेनंतरही संबंधित अधिकाऱ्यांकडून तत्काळ आपत्कालीन यंत्रणा कार्यान्वित न झाल्याची बाब समोर आली. उपअभियंता घटनावेळी अनुपस्थित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. वाढत्या उन्हामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली होती. घटनेची माहिती मिळताच आमदार कैलास घाडगे पाटील सायंकाळी ५ वाजता घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फोनद्वारे सूचना देत यंत्रणा तातडीने कार्यान्वित करण्याचे आदेश दिले तसेच गैरहजर अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली. यावेळी नगराध्यक्ष सुनंदा कापसे, उपनगराध्यक्ष गायकवाड, गटनेते संजय मुंदडा, नगरसेवक सागर मुंडे, भूषण करंजकर, हर्षद अंबुरे, विलास पाटील, माजी नगरसेवक प्रताप मोरे, प्रदीप मेटे आदी उपस्थित होते. या संपूर्ण घटनेदरम्यान शहरातील तरुणांनीही पुढाकार घेत अग्निशमन दलाला मोलाचे सहकार्य केले. फायर एक्सटिंग्विशर उपलब्ध करून देणे तसेच बचावकार्यांत मदत करणे, अशी भूमिका त्यांनी पार पाडली. गेल्या काही दिवसांपासून शहरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिक आधीच त्रस्त आहेत. या घटनेनंतर महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त होत असून निष्काळजी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# केशेगाव येथे जनता दरबार उत्साहात

## विविध विभागांच्या समस्यांचे निवारण




**आरंभ मराठी । धाराशिव**

आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार व धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 30 एप्रिल रोजी केशेगाव येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा गोपाळ कदम व उपसभापती प्रमोद पाटील यांनी भूषविले. या जनता दरबाराला केशेगाव गटाच्या जि.प. सदस्या सुमनताई भद्रे, पंचायत समिती सदस्या संजीवनी पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रशांत रणदिवे, नलावडे साहेब, आमदार राणा पाटील यांचे स्वीय सहाय्यक विशाल यादव, केशेगावचे सरपंच अभिजीत पाटील तसेच काका शेळके, प्रवीण भद्रे, बालाजी शिंदे, बालाजी लोखंडे, अमोल नवले, दिलीप सिंदफळे, अहमद पठाण, गणपत कोळगे, वाघे मॅडम, प्रभुलिंग वाघाळे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, बूथ प्रमुख, अंगणवाडी सेविका, सुपरवायझर, बचत गट महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. तसेच ग्रामसेवक, आरोग्य केंद्रातील अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अभियंते, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरबारात बांधकाम, आरोग्य, घरकुल, पाणीपुरवठा, मनरेगा, पशुसंवर्धन, शिक्षण, अंगणवाडी, तहसील, एमएसईबी आदी विभागांशी संबंधित समस्यांवर सविस्तर चर्चा करून अनेक तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यात आले. ज्या समस्या तत्काळ सोडविता आल्या नाहीत, त्यांची निवेदने स्वीकारून पुढील दहा दिवसांत मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रामविकास अधिकारी बालाजी चौगुले यांनी केले, तर आभार प्रदर्शन सरपंच अभिजीत पाटील यांनी केले.

# तेरच्या डॉ. इम्रान मोमीन यांचा 'प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कारा' ने गौरव


**आरंभ मराठी । तेर**



महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड यांच्या वतीने आयोजित "प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार २०२६" हा भव्य पुरस्कार सोहळा पुणे येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात तेर येथील डॉ. इम्रान मोमीन यांना औषधनिर्माण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासोबतच शिक्षण, संशोधन तसेच प्रशिक्षण व नियुक्ती (ट्रेनिंग व प्लेसमेंट) क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. राज्यभरातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला. डॉ. मोमीन हे धाराशिव येथील के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असून त्यांनी शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल जोशी, संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील तसेच प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील यांनी डॉ. मोमीन यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. हा उपक्रम टाइम्स ऑफ पुणे व आझाद फाउंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

# खामकरवाडीतील डॉ. अतुल होळे लिखित फार्माकोलॉजी पुस्तकाचे प्रकाशन

**आरंभ मराठी । येरमाळा**




महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत खामकरवाडी (ता. वाशी) येथील डॉ. अतुल होळे लिखित "Concise Textbook of Pharmacology for Medical Students" या पुस्तकाचा भव्य प्रकाशन सोहळा बीड येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजमध्ये पार पडला.या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. अरुण भस्मे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ. गणेश पांगरकर, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच होळे कुटुंबीय उपस्थित होते. प्रकाशनप्रसंगी डॉ. भस्मे यांनी पुस्तकाचे कौतुक करत फार्माकोलॉजीसारखा अवघड विषय सोप्या पद्धतीने मांडल्याचे सांगितले. हे पुस्तक वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार असून शिक्षण क्षेत्रात सकारात्मक परिणाम घडवेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने बुद्ध पौर्णिमा उत्साहात



**आरंभ मराठी । धाराशिव**

फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने तथागत गौतम बुद्ध यांची २५७० वी जयंती अर्थात बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विश्वरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून समितीच्या जागेतील तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीला पुष्प अर्पण करण्यात आले व बुद्ध वंदना घेण्यात आली. कार्यक्रमात बुद्धांच्या शांतता, समता आणि बंधुतेच्या विचारांचा जागर करण्यात आला. यावेळी सामाजिक बांधिलकी जपत जवाहर फ्लॉवरचे विक्रेते रियाज शेख हे गेल्या तीन वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना दररोज मोफत पुष्पहार अर्पण करण्यासाठी देत असल्याबद्दल त्यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सोलापूर येथून आलेले नागेश कोकरे व रिमित जैन यांचेही समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महामानव महा जयंती महोत्सवात सादर करण्यात आलेल्या आकर्षक देखाव्याचा समारोप पत्रकार मल्लिकार्जुन सोनवणे व पत्रकार किरण कांबळे यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीला पुष्प अर्पण करून करण्यात आला. या प्रसंगी समितीचे अध्यक्ष गणेश रानबा वाघमारे, सचिव प्रवीण जगताप, उपाध्यक्ष संजय गजधने, नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे यांच्यासह धनंजय वाघमारे, बलभीम कांबळे, अंकुश उबाळे, संपतराव शिंदे, स्वराज जानराव, अतुल लष्करे, अशोक बनसोडे, गुणवंत सोनवणे, पुष्पकांत माळाळे, रोहिदास झेंडे, शिलाताई चंदनशिवे, विद्याताई धावारे, जयश्री चव्हाण, स्वामीनाथ चंदनशिवे, विजय गायकवाड, बापू बनसोडे, निखिल बनसोडे, राजाभाऊ बनसोडे, ॲड. कांबळे, अजय भावे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुक्तांगण प्रायमरी स्कूलच्या मुलांचे डी.टी.एस. परीक्षेमध्ये यश

**आरंभ मराठी । धाराशिव**



येथील मुक्तांगण प्रायमरी इंग्लिश स्कूल व पेंग्विन किड्स प्रि. प्रायमरी इंग्लिश स्कूल, धाराशिव च्या विद्यार्थ्यांनी डी.टी.एस परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. ऋग्वेद हेल्थ फाउंडेशन बारामती यांच्या वतीने 2026 मध्ये घेण्यात आलेल्या डायमंड टॅलेंट सर्च या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या परीक्षेमध्ये मुक्तांगण प्रायमरी इंग्लिश स्कूल धाराशिव व पेंग्विन किड्स प्रि. प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल या शाळेतून एकूण 72 विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिलेली होती. त्यापैकी 11 विद्यार्थी हे गुणवत्ताधारक झालेले आहेत. यामध्ये इयत्ता पहिलीतील कृषी सुशील खडके हिने सुवर्णपदक तर इयत्ता चौथीतील श्रेया ज्ञानेश्वर लोंढे ही विभागातून प्रथम आलेली आहे. नर्सरी मधील भार्गवी अजित कसबे हिने सुवर्णपदक तर प्रचिती प्रसाद पवार ही उत्तेजनार्थ आलेली आहे. ज्युनिअर के.जी या वर्गातून शिवांश हनुमंत कोतले, मोरया निखिल मुसळे, भार्गवी भागवत बगाडे या विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक तर मृणाली व्यंकट चौगुले ही विद्यार्थिनी विभागातून द्वितीय आलेली आहे. सीनियर के.जी या वर्गातून आरोही योगेश जावळे व समृद्धी सचिन सुरवसे या विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिळविले आहेत तर शुभ्रा मुकुंद उंबरे ही उत्तेजनार्थ आलेली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षक व पालकांचे संस्थेच्या संस्थापिका श्रीमती कमलताई नलावडे यांनी अभिनंदन केले.

# रेशन दुकानात धिंगाणा; मशिन फोडून २५ हजारांचे नुकसान

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील शिराढोण येथे रेशन दुकानात धिंगाणा घालत मशिन फोडून सुमारे २५ हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विजय राजेंद्र गंभीरे (रा. शिराढोण) यांनी दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी रात्री शिराढोण येथील रेशन दुकानात जाऊन रेशनकार्डशिवाय गहू व तांदूळ देण्याची मागणी केली. यावेळी फिर्यादी उमाबाई अंकुश माने (वय ३०) यांच्या पतीने रेशनकार्डशिवाय धान्य देणे शक्य नसल्याचे सांगितले. यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने शिवीगाळ करत दुकानातील इलेक्ट्रॉनिक मशिन जमिनीवर आपटून फोडले, तसेच ते मशिन फिर्यादीच्या अंगावर फेकल्याने त्यांच्या जीवितास धोका निर्माण होईल असे कृत्य केले. या घटनेत सुमारे २५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी उमाबाई माने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३२४ (४), १२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दैनिक आरंभ मराठी

## विज्ञान शाखेचा ९७.४३% निकाल

# श्रीपतराव भोसले विद्यालयाची बारावी निकालाची परंपरा कायम

**आरंभ मराठी । धाराशिव**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने लातूर विभागात आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. मोठ्या संख्येने विद्यार्थी परीक्षेला बसूनही विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विज्ञान शाखेत एकूण ८५६ विद्यार्थ्यांपैकी ८३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ४२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. या शाखेचा निकाल ९७.४३ टक्के लागला आहे. जाधव राज चंद्रजीत यांनी ९६.१७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. कु. भगत सिद्धी अरविंद (९५%) यांनी द्वितीय, तर निकम धैर्यशील कुमार (९४.६४%) यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. कला शाखेत १८८ पैकी १८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ९ जणांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे.

या शाखेचा निकाल ९५.७४ टक्के लागला. कु. चंदेले वैष्णवी विरेंद्रसिंह (९२.३३%) प्रथम, कु. सय्यद सुमय्या अल्ताफ (८४.५०%) द्वितीय, तर पाटील देवदत्त सिताराम (८३.००%) तृतीय ठरले. वाणिज्य शाखेत ६४ पैकी ६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ८ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. या शाखेचा निकाल ९५.३१ टक्के लागला. कु. उंबरे सृष्टी प्रदीप (८६.६३%) प्रथम, कु. खांडवे आरती बालाजी (८६.६७%) द्वितीय, तर शेख सोफीयान अजीजुद्दीन (८६.३३%) तृतीय आले. संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी सरचिटणीस प्रेमाताई सुधीर पाटील, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी एस. एस. देशमुख, प्राचार्य एन. आर. नन्नवरे, उपप्राचार्य एस. के. घार्गे, पर्यवेक्षक के. के. कोरके, एम. व्ही. शिंदे, तसेच फिजिक्सवाला विभाग प्रमुख ए. व्ही. भगत, फेनॉमेनाल बॅच प्रमुख एस. एस. सदाफुले यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# दाळींब येथे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**आरंभ मराठी । दाळींब**




उमरगा तालुक्यातील दाळींब येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत १ मे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. यावेळी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक कोकळगावे अब्दुलकादर व शाळा व्यवस्थापन समितीचे मार्गदर्शक तज्ञ सदस्य तसेच माजी उपसरपंच हिराजी पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर श्रीराम पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या निर्मितीचा इतिहास, त्याचे महत्त्व आणि लौकिक याबाबत मार्गदर्शन केले. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रगती पुस्तकाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच महात्मा गौतम बुद्ध जयंतीच्या निमित्ताने शांती, प्रेम, करुणा आणि सद्भावना या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन शिक्षकांना केले. कार्यक्रमादरम्यान शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षक अंकुश पवार आणि इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी इरम वरनाळे यांचा वाढदिवस पुष्पगुच्छ देऊन साजरा करण्यात आला. वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सुरुवात होऊन ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व राज्यगीताने समारोप करण्यात आला. यावेळी अंगणवाडी कार्यकर्त्या जयश्री ढंगापुरे, सुरेखा सुरवसे, सुनिता चव्हाण, पूजा राठोड, तमिज बी शेख, सुनिता सुरवसे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक सत्यकला सूर्यवंशी, शेवंता चव्हाण, पंचशीला सातपुते, उज्वला शिंदे, मंगल कसले, देवयानी आंबेकर पाटील, सुनिता माकणे, सुवर्णा जगताप, अजित जगताप व उमेश कांबळे यांनी परिश्रम घेतले. शेवटी गोविंद जाधव यांनी वर्गशिक्षकांना प्रगती पत्रकांचे वितरण करण्याचे आवाहन करत उपस्थितांचे आभार मानले.